# वाक्यरूपांतर

- लेखन करताना काही वेळा वाक्यरचनेत बदल करण्याची गरज असते, अशा बदलाला 'वाक्यरूपांतर' असे म्हणतात.
- वाक्यांचे रूपांतर करताना वाक्यरचनेत बदल होतो, पण वाक्याचा अर्थ बदलत नाही.
- विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, उद्गारार्थी, होकारार्थी, नकारार्थी या वाक्यांचे एकमेकांत रूपांतर होतो.

① प्रश्नार्थी वाक्य - महात्मा गांधीजींचे कार्य कोण विसरेल?

विधानार्थी वाक्य - महात्मा गांधीजींचे कार्य कोणी विसरणार नाही.

② उद्गारार्थी वाक्य - किती सुंदर फूल आहे हे!

- विधानार्थी वाक्य - हे फूल खूप सुंदर आहे.

'किती' या उद्गारवाचक शब्दाऐवजी 'खूप' हे विशेषण वापरले आहे.

③ आज्ञार्थी वाक्य - वडीलधाऱ्या माणसांचा आदर करा.

विधानार्थी वाक्य - वडीलधाऱ्या माणसांचा आदर करणे योग्य आहे.

'करा' या आज्ञार्थी क्रियापदाचे 'करणे' असे रूप करुण मांडले आहे.

विधानार्थी वाक्य- हे हस्ताक्षर खूप सुंदर आहे
प्रश्नार्थी वाक्य- हे हस्ताक्षर खूप सुंदर आहे, नाही?
उद्‌गारार्थी वाक्य- किती सुंदर आहे हे हस्ताक्षर!
आज्ञार्थी वाक्य- हस्ताक्षर सुंदर काढा.

*) होकारार्थी (affirmative) व नकारार्थी (negative) वाक्ये :-

1) ज्या वाक्यात होकार दर्शविला असतो तेव्हा त्या वाक्यास होकारार्थी किंवा करूणरूपी वाक्य म्हणतात.

2) ज्या वाक्यात नकार दर्शविला असतो तेव्हा त्या वाक्यास नकारार्थी किंवा अकरूणरूपी वाक्य म्हणतात.

eg:- ① समिधा धीट मुलगी आहे (होकारार्थी)
② समिधा भित्री मुलगी नाही (नकारार्थी)

रूपांतर करताना काय केले?

'धीट' या शब्दाचा विरुद्धार्थी 'भित्रा' हा शब्द योजला आहे आणि 'आहे' या होकारार्थी क्रियापदाऐवजी 'नाही' हे नकारार्थी क्रियापद योजला आहे.

धीट ↔ भित्रा आहे ↔ नाही

eg.

| होकारार्थी | नकारार्थी |
| --- | --- |
| - भारताचा विजय झाला | - भारताचा पराजय झाला |
| - मला जवळच जायचे होते | - मला लांब जायचे नव्हते. |

Worksheet

(वाक्यरूपांतर)

1) सर्वांनी रांगेत उभे राहावे. (आज्ञार्थी करा.)
2) ताई उंच आहे (नकारार्थी करा)
3) ही इमारत खूप उंच आहे (उद्गारार्थी करा)
4) तू कोणत्या शाळेत जातेस ते मला सांग (प्रश्नार्थी करा)
5) आत जाण्याचे सर्व मार्ग खुले नव्हते (होकारार्थी करा)
6) अबब! केवढा मोठा हा साप! (विधानार्थी करा)
7) दररोज अभ्यास करावा (आज्ञार्थी करा.)
8) तुझ्या भेटीने खूप आनंद झाला (उद्गारार्थी करा.)
9) किती पाऊस पडला काल रात्री! (विधानार्थी करा.)
10) आई रात्रभर जागी होती (नकारार्थी करा)
11) पांढरा रंग कोणाला आवडत नाही? (विधानार्थी करा)
12) ते काम लहान नाही (होकारार्थी करा)
13) प्रवासात भरभरुण बोलावे (आज्ञार्थी करा)
14) किती सुंदर आहे ताजमहाल! (विधानार्थी करा)
15) तू कुठे राहतोस, ते मला सांग (प्रश्नार्थी करा)
16) भारतीय सेना युद्धात विजयी झाली (नकारार्थी करा.)
17) हे चित्र मला पसंत आहे (नकारार्थी करा)
18) आमची परिस्थिती अनुकूल नव्हती (होकारार्थी करा)
19) राजूच्या भल्यासाठी आईने खूप काही केले (प्रश्नार्थी करा)
20) नेहमी हसत हसत जगावे (आज्ञार्थी करा)